



# पारनेर दर्शन







वर्ष १ अंक २२२, शनिवार १८ मे २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


## महसूल, पोलीस अधिकाऱ्यांची उमेदवाराप्रमाणे भूमिका!

### ■ नीलेश लंके यांचा गंभीर आरोप ■ घराची झडती घेतलेल्या धुमाळ कुटूंबाची घेतली भेट

राहुरी : श्रीकांत जाधव, ऋषी राऊत

**आजवरच्या राजकीय प्रवासात मी अनेक निवडणूका पाहिल्या. निवडणूका लढविल्या. काही निवडणूकांमध्ये नेतृत्व करण्याचीही भूमिका बजावली. या लोकसभेच्या निवडणूकीमध्ये मात्र सत्तेचा किती गैरवापर केला जातो हे मी स्वतः अनुभवले आहे. पोलीस व महसूल प्रशासनातील अधिकाऱ्यांनी या निवडणूकीत स्वतः उमेदवार असल्यासारखी भूमिका बजावल्याचा गंभीर आरोप महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी केला.**

राहुरी शहरातील विकास मंडळाचे नेते स्व. रामदास पाटील धुमाळ यांचे नातू मंदार धुमाळ यांच्याविरोधात मतदारांना पैसे वाटल्याची तक्रार करण्यात आल्यानंतर निवडणूक अधिकारी तसेच पोलीस अधिकाऱ्यांनी धुमाळ यांच्या घराची झडती घेतली. या झडतीमध्ये धुमाळ यांच्याकडे काहीही आक्षेपार्ह आढळून आले नाही. या पार्श्वभुमीवर महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी राहुरी येथे धुमाळ यांच्या निवासस्थानी जाऊन धुमाळ परिवाराची भेट घेतली. आ. लंके याच्या भेटीप्रसंगी मंदार धुमाळ, अमृत धुमाळ, सागर तनपुरे, संतोष आघाव, नंदकुमार तनपुरे, महेश उदावंत, संतोष आघाव, नंदकुमार तनपुरे, महेश उदावंत, बबलू रोहोकले आदी उपस्थित होते. या भेटीनंतर लंके यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला.

लंके म्हणाले, राहुरी येथे धुमाळ परिवाराची झडती घेण्यात आली. या गोष्टीचा मी निषेध करतो. ज्या स्व. रामदास पाटील धुमाळ यांनी अनेक संस्था उभ्या केल्या. अनेक कुटूंबांचे आधार म्हणून रामदास पाटील धुमाळ आणि त्यांचा परिवार उभा राहिला आहे.



■ मंदार धुमाळ यांनी निवडणूकीत पैसे वाटल्याच्या तक्रारीनंतर त्यांच्या घराची झडती घेण्यात आल्याच्या पार्श्वभुमीवर नीलेश लंके यांनी धुमाळ परिवाराची भेट घेतली. (छाया : ऋषी राऊत)

### मी, आ. तनपुरे धुमाळ परिवाराच्या पाठीशी

आज नाना नाहीत. मंदारचे वडील हयात नसले तरी मी,आमदार प्राजक्तदादा तनपुरे मंदारचे भाऊ इथे उभे आहेत. मंदार याच्या पाठीशी नव्हे तर त्यांच्या पुढे दोन पाउले आम्ही असणार आहोत.

**नीलेश लंके**
महाविकास आघाडीचे उमेदवार

### मंदार पुढे चालला म्हणून त्यांना त्रास

धुमाळ यांच्या घरामध्ये काहीही नव्हते. केवळ आमच्या धुमाळ परिवारातील एक युवक पुढे चालला आहे. चांगले काम करतो आहे. युवकांचे मोठे संघटन उभे करतो आहे. त्याचा विरोधकांना त्रास होतो आहे म्हणून संपूर्ण परिवारावरच घाव घालायचा प्रयत्न केला गेला. महिलांना चुकीच्या पध्दतीने त्रास दिला गेला. प्रशासनाचा चुकीच्या पध्दतीने वापर करण्यात आल्याचा आरोप लंके यांनी केला.

### धुमाळांना झालेल्या त्रासाचे प्रत्युत्तर देऊ

धुमाळ परिवाराला पोलीस प्रशासनाने जो त्रास दिलेला आहे, त्या त्रासाला एक ना एक दिवस आम्ही प्रत्युत्तर दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. या परिवाराचा स्नेही या नात्याने नीलेश लंके त्यांच्या पाठीशी खंबिरपणे उभा असल्याचे लंके म्हणाले.

### नियती तुम्हाला माफ करणार नाही

नानांच्या बोटाला धरून तुम्ही राहुरी तालुक्यात आणि परिसरात राजकारण केले. त्याच नानांच्या परिवाराला तुम्ही अशा पध्दतीने त्रास देणार असाल तर नियती तुम्हाला कधीही माफ करणार नाही असे लंके म्हणाले.

आजही राहुरी व व परिसरात, तालुक्यात एखाद्या कुटूंबाला अडचण आल्यानंतर त्यांच्या मदतीला धावून जाणारा आमचा धुमाळ परिवार असून या परिवारातील मंदार धुमाळ यांच्या घराची चुकीच्या पध्दतीने झडती घेतली जाते. महिलांना वेठीस धरले जाते. झालेला हा प्रकार अतिशय निंदनिय असल्याचे लंके म्हणाले.

## म्हसणे फाट्यावर दोन गटांत राडा

### एमआयडीसीतील कॉट्रॅक्टवरून हाणामारी, दगडफेक

म्हसणे फाटा : प्रतिनिधी




**औद्योगिक वसाहतीमधील वाहतूकीच्या कॉट्रॅक्टवरून दोन गटांमध्ये नगर-पुणे महामार्गावर तुफान राडा झाला. हाणामारी तसेच दगडफेक करीत दोन गट एकमेकांना भिडल्याने महामार्गावरून जाणाऱ्या येणाऱ्या नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते. सुपा पोलीसांनी केलेल्या हस्तक्षेपानंतर तासभर सुरू असलेला हा राडा थांबला.**

विस्तारीत एमआयडीसीमध्ये उभारण्यात आलेल्या एका कंपनीच्या ट्रान्सपोर्टचे कॉक्ट्रॅक्टर परीसरातील काही तरूणांकडे गेल्या चार वर्षांपासून आहे. या तरूणांनी या कॉक्ट्रॅक्टवरचा हक्क सोडावा यासाठी सुरू असलेल्या चर्चेतून वादाची ठिगणी पडली आणि त्याचे रूपांतर धुमश्चक्रीमध्ये झाले.

एमआयडीसील लगतच्या नगर-पुणे महामार्गावर दोन्ही गट एकमेकांना भिडले. हाणामारी तसेच दगडफेक सुरू झाल्याने जवळपास तासभर या भागात तणावाचे वातावरण होते. पारनेर तालुक्यासह तालुक्याबाहेरील काही तरूणही या धुमश्चक्रीत सहभागी झाले होते.

या घटनेची माहीती समजल्यानंतर सुपा पोलीसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलीसांनी दोन्ही बाजूच्या तरूणांना पांगविल्यानंतर या भागात शांतता प्रस्तावित होउन महामार्गावरील वाहतूकही सुरळीत झाली.

विविध कंपन्यांचे कॉक्ट्रॅक्ट घेण्यावरून या भागात तरूणांच्या गटामध्ये नेहमीच वाद होतात. गुंड प्रवृत्तीच्या तरूणांना पुढे करून स्वतःची पोळी भाजून घेण्याचा काही तरूण प्रयत्न करतात. दुसऱ्याचे कॉन्ट्रॅक्ट आपणाकडे घेण्यासाठी सुरू असलेला बळाचा वापर एमआयडीसीमधील उद्योजकांसाठी नेहमीच डोकेदुखीचा विषय ठरलेला आहे.

दरम्यान, पोलीसांनी म्हसणे फाटा येथील दोन्ही गटातील तरूणांचा जमाव पांगवून शांतता प्रस्तापित करण्यात आली असली तरी याप्रकरणी कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

## कांदा प्रश्न : घोषणाबाजी तरुणाने सांगितली खरी कहाणी

### त्या तरूणाची शरद पवारांशी भेट




नाशिक : प्रतिनिधी

**पंतप्रधान नरेंद्र मोदी पाचव्या टप्प्यासाठी प्रचार करत असून त्यांनी दोन दिवसांपूर्वी नाशिकमध्ये सभा घेतली. यावेळी इंडिया आघाडीवर टीका करत असताना सभेत उपस्थित असलेल्या एका तरूणाने कांद्यावरून घोषणाबाजी केली होती. ज्यामुळे पंतप्रधान मोदींना कांद्यावर बोलावे लागले होते. घोषणा देणारा तरूण शरद पवार यांचा कार्यकर्ता असल्याचा आरोप दिंडोरीच्या खासदार डॉ. भारती पवार यांनी केला. या घोषणाबाजीनंतर नाशिकमधील राजकीय वातावरण चांगलेच तापले. खुद्द शरद पवार यांनीही या घोषणाबाजीचे समर्थन केले. त्यानंतर आता ज्या तरूणाने ही घोषणाबाजी केली, त्याने त्यामागची पार्श्वभूमी सांगितली आहे.**

घोषणाबाजी करणाऱ्या तरूणाचे नाव किरण सानप असून आज (दि. १७ मे) त्याने शरद पवार यांची नाशिक येथे भेट घेतली. ही भेट झाल्यानंतर माध्यमांशी बोलत असताना किरण सानप याने सर्व घटनाक्रम सांगितला. ''१५ मे रोजी मी पंतप्रधान मोदींच्या सभेत सामान्य नागरिक म्हणून उपस्थित होतो. पंतप्रधानांचे भाषण मी काळजीपूर्वक ऐकत होतो. आमच्या प्रश्नांवर ते बोलतील, अशी अपेक्षा होती. मात्र ते हिंदू-मुस्लीम आणि धार्मिक मुद्द्यावर बोलत राहिले. १५-२० मिनिटांनी माझा धीर सुटला, त्यामुळे मी त्यांना कांद्यावर बोलण्याची विनंती केली'', असे किरण सानप यांनी सांगितले.

**घोषणाबाजी करण्यास पक्षाने सांगितले का?**

किरण सानप पुढे म्हणाले की, मी शरद पवार यांना माननारा कार्यकर्ता आहे. पण ही घोषणाबाजी करण्यासाठी कुणीही मला उद्युक्त केलेले नव्हते किंवा याबाबत मला कुणीही काही सांगितलेले नाही. मी एक सामान्य शेतकरी आहे. त्या अनुषंगाने मी स्वयंप्रेरणेने मोदींना कांद्यावर बोलण्यासाठी आग्रह केला.

**सभेच्या दिवशी नेमकं काय घडलं?**

पंतप्रधाननरेंद्र मोदीभाषण करत होते तितक्यात समोरुन घोषणा आली, ''कांद्यावर बोला.. कांद्यावर बोला.'' या शेतकऱ्याने दोन ते तीन वेळा घोषणा दिल्या. त्यानंतर मोदी एक क्षण थांबले, समोरुन मोदी-मोदी अशा घोषणा येऊ लागल्या. त्यानंतर मोदींनी जय श्रीराम च्या घोषणा दिल्या. भारतमाता की जय या घोषणाही दिल्या. तसंच पुढे त्यांनी आपला मुद्दा पूर्ण केला. मोदींच्या सभेत गोंधळ घालणाऱ्या या शेतकरी तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतलं आणि सभास्थळावरुन बाहेर नेलं.

**शरद पवार काय म्हणाले?**

शरद पवारांना सदर घटनेबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावेळी ते म्हणाले की, नाशिकच नाही तरधुळे,पुणे, सातारा अशा जिल्ह्यांमध्ये कांद्याचा प्रश्न उग्र उर्वरीत पान ३ वर

## पवार, तटकरेंच्या आरोपात काहीच चुकीचे नव्हते

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची स्पष्टोक्ती



मुंबई : प्रतिनिधी

**सिंचन घोटाळा प्रकरणात अजित पवार आणि सुनील तटकरे यांच्यावर आरोप केले, त्यात चुकीचं काही नव्हतं. या प्रकरणात मी जे प्रश्न उपस्थित केले, त्यानुसार कारवाई करण्यात आली असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. सिंचन घोटाळा प्रकरणी २०१४ मध्ये अजित पवार, तर गँगस्टर इक्बाल मिर्चीशी असलेल्या कथित संबंधांबद्दल प्रफुल्ल पटेल यांच्यावर आरोप करणे ही चूक होती का? असा प्रश्न विचारला असता फडणवीसांनी एका मुलाखतीत भूमिका स्पष्ट केली.**

लोकसभा निवडणुकांना देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे पहिल्यांदाच एकत्रित सामोरे जात आहेत. गेली काही वर्ष विरोधात असताना, भाजपने ज्यांच्यावर भ्रष्टाचार आणि घोटाळ्याचे आरोप केले, त्यांच्याच मांडीला मांडी लावून बसल्यावरुन फडणवीसांना सवाल विचारले जात आहेत. यावरुन फडणवीसांना एका मुलाखतीत प्रश्न विचारला असता, त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

**देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?**

मी लावलेले सर्व आरोप खरे ठरले. मी उपस्थित केलेल्या सर्व बाबींवर कारवाई करण्यात आली. त्या प्रकरणांमध्ये एफआयआर नोंदवण्यात आले, आरोपपत्र दाखल करण्यात आले आणि काही जणांना दोषीही ठरवण्यात आले. यामुळे सर्व निकष दुरुस्त करण्यात आल्याचे मला समाधान आहे. भ्रष्ट कारभाराला आळा बसला आणि निविदा प्रक्रियेत सर्व नवीन नियम व अटी लागू करण्यात आल्या, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले. उर्वरीत पान ३ वर

## अजितदादांची दांडी, भुजबळांची नाराजी तटकरे-शरद पवार भेटीची चर्चा

नाशिक: प्रतिनिधी



**लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु असताना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये लक्षवेधी घडामोडी घडत आहे. गेल्या चार ते पाच दिवसांपासून उपमुख्यमंत्री अजित पवार सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये दिसलेले नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदी १५ मे रोजी राज्याच्या दौऱ्यावर होते. त्यांच्या सभा दिंडोरी आणि कल्याणमध्ये झाल्या. मुंबईत रोड शो झाला. अजित पवार सभा, रोड शोला अनुपस्थित होते.**

मंत्री छगन भुजबळ नाराज असल्याची चर्चा आहे. तर प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंनी शरद पवारांची हॉटेलमध्ये भेट घेतल्याची चर्चा सुरु झाल्यानं एकच खळबळ उडाली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार गेल्या काही दिवसांपासून सभा, रोड शोमध्ये दिसलेले नाहीत. मोदींच्या दौऱ्यातही ते कुठेच नव्हते. दिंडोरीतील मोदींच्या सभेला राष्ट्रवादी काँग्रेसकडून छगन भुजबळ, तर कल्याणमधील सभेला सुनील तटकरे हजर होते. त्यामुळे अजित पवार नेमके आहेत कुठे, अशी चर्चा सुरु झाली. आज मोदींची मुंबईतील शिवाजी पार्कात सभा होत आहे. या सभेला अजित पवार उपस्थित राहणार असल्याचं कळतंय.

नाशिक लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी न मिळाल्यानं छगन भुजबळ नाराज असल्याची चर्चा आहे. शिवसेनेचे उमेदवार हेमंत गोडसे यांच्या प्रचारात भुजबळ आणि त्यांचे कार्यकर्ते दिसत नाहीत. राष्ट्रवादीची नाशकात चांगली ताकद आहे. मात्र ती महायुतीच्या उमेदवारामागे उभी राहिली असल्याचं चित्र दिसत नाही. भुजबळांच्या भेटीसाठी भाजपचे मंत्री आणि संकटमोचक गिरीश महाजन आज भुजबळ फार्मवर पोहोचले. दोन्ही नेत्यांमध्ये काही वेळ चर्चा झाली. उर्वरीत पान ३ वर










# चंदेरी

# लढत राहिले पाहिजे, जोपर्यंत हवे ते मिळत नाही...

## अभिनेत्री मनिषा कोईरालाची विशेष मुलाखत



**नव्वदच्या दशकातील प्रसिद्ध अभिनेत्री मनीषा कोईराला सध्या संजय लीला भन्साळी यांच्या 'हिरामांडी' या वेबसिरिजमुळे चर्चेत आहे. या मालिकेत तिने हिरामंडीच्या हुजूर मल्लिका जानची दमदार भूमिका साकारली आहे. या संदर्भात झालेल्या एका खास संवादात मनीषाने या पात्राच्या तयारीपासून ते भन्साळींसोबत हम दिल दे चुके सनम आणि देवदास सारखे चित्रपट करू न शकण्यापर्यंत अनेक खुलासे केले.**

आजकाल, माधुरी दीक्षित, रवीना टंडन, काजोल यांसारख्या नव्वदच्या दशकातील आघाडीच्या अभिनेत्री ओटीटीवर दमदार भूमिका करून आपल्या अभिनयाला नवी उंची देत आहेत. आता यामध्ये मनीषा कोईरालाच्या नावाचाही समावेश करण्यात आला आहे. तिने भन्साळी यांच्या हिरामंडी या वेब सिरीजमध्ये एका वेश्यालयाच्या मालकिनीची भूमिका साकारली आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे भन्साळींच्या खामोशी या चित्रपटाचीही मनीषा हिरोईन होती, पण त्यानंतर ती कधीही त्यांच्या चित्रपटात दिसली नाही. याविषयी मनीषा सांगते की, तिला भन्साळींचे हम दिल दे चुके सनम आणि देवदास या सुपरहिट चित्रपटांची ऑफर आली होती, पण काही जमले नाही.

### दोनशे टक्के योगदान...

हिरामंडीमध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातील गणिका मल्लिका जानची भूमिका मनिषा साकारत आहे. याबद्दल मनीषा म्हणते, की कोच मुनिराजी यांनी मला मल्लिका जानच्या उच्चार आणि उच्चारासाठी खूप मदत केली. देहबोलीबद्दल सांगायच्या, तर माझी आजी आणि माझी आई सर्व शास्त्रीय नृत्यांगना होत्या. आमच्या घरी मोठमोठ्या बैठका असायच्या, ज्यामध्ये खूप कार्यक्रम व्हायचे, त्यामुळे मला शास्त्रीय नृत्य वयाच्या तिसऱ्या वर्षापासून अवगत होते. पण जेव्हा मी बॉलीवूड डान्स वगैरे सुरू केले, तेव्हा मला ते सोडावे लागले. मल्लिका जानच्या आंतरिक भावनांसाठी मला संजयसारखा उत्तम दिग्दर्शक मिळाला होता. तो पात्रातील असुरक्षितता, वेदना इत्यादी अतिशय चांगल्या प्रकारे समजावून सांगतो, ज्यामुळे काम करणे सोपे होते.



### भविष्यातही संघर्ष...

मालिकेतील मल्लिका ही एक अतिशय ताकदवान व्यक्तिमत्त्व आहे; पण तिला अनेकदा तुच्छतेने पाहिले जाते. स्त्री म्हणून कधी कमीपणाची भावना निर्माण झाली आहे का? यावर मनीषाला म्हणते, सर्व महिलांनी कधी ना कधी कुटुंबात, आयुष्यात, कामाच्या ठिकाणी या गोष्टींचा सामना केला आहे. देवाच्या कृपेने तुमचे पालक चांगले असतील तर ते तुम्हाला तुमच्या मार्गावर राहण्याची, स्वतःवर विश्वास ठेवण्याची आणि तुमच्या हक्कांसाठी उभे राहण्याची प्रेरणा देतात. नाहीतर आम्हा स्त्रियांना प्रत्येक गोष्टीसाठी खूप कष्ट करावे लागतात. भविष्यातही हा संघर्ष सुरूच राहील. मला वाटते की ही एक लढाई आहे जी लढत राहिली पाहिजे, लढत राहिली पाहिजे, जोपर्यंत आपण ती मिळवत नाही, असे मनिषा म्हणाली.

### नेपाळमध्ये शेती...

सामान्यतः आपल्या कलाकारांची पुनरावृत्ती करणाऱ्या भन्साळींसोबत खामोशीनंतर कोणताही चित्रपट न करण्याबद्दल बोलताना मनीषा म्हणाली, की मी हम दिल दे चुके सनम आणि देवदास करणार होते. पण काही गोष्टी घडल्या. काही तारखा इकडे-तिकडे झाल्या, पुढे ढकलल्या गेल्या. त्यामुळे मला ते चित्रपट करता आले नाहीत. माझा विश्वास आहे की जे घडायचे आहे ते आपोआप घडते. मी आयुष्यात फार महत्वाकांक्षी कधीच नव्हते. मी नेहमीच माझ्या गतीने काम केले आहे. बाकी, देवाच्या कृपेने मला चांगले काम मिळत आहे. जेव्हा मला हिरामंडीची ऑफर दिली गेली, तेव्हा मी नेपाळमध्ये माझ्या जगात शेती करून आनंदी होते. जेव्हा काहीतरी घडायचे असते तेव्हा ते येते. याचा अर्थ जेव्हा जेव्हा काम येते तेव्हा मी माझे दोनशे टक्के योगदान त्यात देते. मला आनंद आहे की मी संजयच्या खामोशीमध्ये काम केले, जो एक अतिशय साधा, काव्यात्मक आणि संवेदनशील चित्रपट होता, त्यात कोणतीही भव्यता किंवा ग्लॅमर नव्हते, तर आता मी हीरामंडी सारख्या मालिकेत काम केले आहे, ज्यामध्ये सर्वकाही खूप भव्य, सुंदर आणि प्रचंड आहे.

# ओटीटी अन् आधीचा काळ, सोनाली बेंद्रेने स्पष्ट केला फरक!



**अभिनेत्री सोनाली बेंद्रेने नव्वदच्या दशकात अनेक उत्तम चित्रपट केले. लग्न आणि मुलानंतर ब्रेक घेतलेल्या सोनालीने टीव्हीवरील रिॲलिटी शोमधून पुनरागमन केले. अलीकडेच, तिने OTT वर झी ५ च्या वेब सिरीज द ब्रोकन न्यूजद्वारे पदार्पण केले, ज्याचा सीझन २ लवकरच येत आहे. यानिमित्त घेतलेल्या एका विशेष मुलाखतीत सोनालीने तिच्या जुन्या दिवसांबद्दल आणि आजच्या ओटीटी युगाबद्दल मतप्रदर्शन केले...**

पूर्वी अभिनेत्रींच्या करिअरला लग्नानंतर ब्रेक लागायचा. पण आज चित्र बदललंय, याबद्दल काय सांगशील? असे विचारले असता सोनाली म्हणाली, की मी लग्नानंतरही काम करत होते. मूल झाल्यावर ब्रेक घेतला. कारण मला तो वेळ माझ्या मुलासोबत घालवायचा होता. पण हे खरे आहे की आज हिरोइन्सना लग्नानंतर अशा प्रकारच्या संधी मिळत आहेत ज्या त्यांना पूर्वी मिळत नव्हत्या आणि मला याचा खूप आनंद आहे. त्यावेळी काम करणाऱ्या आम्हा सर्व अभिनेत्रींनी खूप लवकर काम करायला सुरुवात केली. तुम्ही कितीही चांगला अभिनेता असलात तरी अनुभवातूनच काही गोष्टी शिकता येतात. आता विविधांगी कथांना पडद्यावर येण्याची संधी मिळत आहे. जी कथा कदाचित पुस्तकरूपात राहिली असती किंवा लघुकथेत रूपांतरित झाली असती. जी कथा चित्रपटाच्या रूपाने समोर येण्याची शक्यता नव्हती. मल्टिप्लेक्स आल्यावर या कथेवर चित्रपटही येऊ लागले आहेत. त्यानंतर ओटीटीच्या आगमनाने सीमारेषा तुटल्या आणि सर्वांना संधी मिळू लागली आहे.

तू सिनेमा, टीव्ही आणि ओटीटी या तिन्ही माध्यमांमध्ये काम केले आहे. तुम्हाला काय फरक जाणवला?, असे विचारले असता सोनाली म्हणाली, की कॅमेऱ्यासमोरचा अनुभव सारखाच आहे. मला प्रतिभावान लोकांना भेटायला खूप आनंद होतो. आपल्या देशात खूप प्रतिभावान लोक आहेत. आता सोशल मीडिया आल्याने त्यांना त्यांच्या कलागुणांचे प्रदर्शन करता येईल असे स्थान मिळत आहे. पण आमच्या काळात देशात एवढी प्रतिभा आहे हे कुणाला माहीतही नव्हते. त्याचे आकर्षण वेगळे होते. कॅमेऱ्यासमोर अभिनय करणे हे रंगभूमीवरील अभिनयापेक्षा थोडे वेगळे आहे. चित्रपट दोन-अडीच तासांत एक गोष्ट सांगतात आणि तुमच्या व्यक्तिरेखेचा एक पैलू दाखवतात. जेव्हा तुम्ही OTT वर मालिका करत असाल, तेव्हा ती दीर्घ कालावधीची असते. त्यात तुम्हाला आणखी काही पैलू दाखवण्याची संधी मिळते. जे पात्र तुम्हाला चित्रपटात २ तासांत पूर्ण करायचे आहे, ते OTT मध्ये तुम्हाला सहा तास मिळतात.

बऱ्याच काळानंतर, श्रेया पिळगावकर आणि जयदीप अहलावत यांच्यासोबत द ब्रोकन न्यूज या वेबसिरीजद्वारे तू अभिनयाच्या जगात परतली आहेस याबद्दल काय सांगशील असे विचारले असता सोनाली म्हणाली, की श्रेया आणि



जयदीप दोघेही खूप चांगले कलाकार आहेत. दोघेही त्यांच्या कामात अप्रतिम आहेत. नवीन लोकांसोबत काम केल्यावर तुम्हाला खूप काही शिकण्याची संधी मिळते. माझ्यासाठी ही इंडस्ट्री खूप बदलली आहे. काम करण्याची पद्धत खूप बदलली आहे. या दोघांकडून मला खूप काही शिकायला मिळाले आणि खूप मजा आली. मी जयदीपबद्दल विचार केला होता की तो लोकांपासून दूर राहणारा माणूस असेल, पण तो तसा नाही. नंतर माझ्या लक्षात आले की तो खूप गोड आणि चांगल्या मनाचा माणूस आहे. श्रेयाच्या काम करण्याच्या पद्धतीतूनही मी खूप काही शिकले आहे, असे सोनाली म्हणाली.

# 'कन्यादान' फेम चेतन गुरव अडकला विवाहबंधनात!

मराठी कलाविश्वात सध्या लगीनघाई सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वीच अमृता बने-शुभंकर एकबोटे, पूजा सावंत-सिद्धेश चव्हाण, तितीक्षा तावडे-सिद्धार्थ बोडके, प्रथमेश परब-क्षितिजा घोसाळकर असे अनेक कलाकार लग्नबंधनात अडकले. आता यामध्ये छोट्या पडद्यावरील आणखी एका लोकप्रिय अभिनेत्याचं नाव जोडलं जाणार आहे. 'कन्यादान', 'वैजू नंबर १' या प्रसिद्ध मालिकांमधून अभिनेता चेतन गुरव घराघरांत लोकप्रिय झाला. सध्या तो वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आला आहे. चेतन नुकताच लग्नबंधनात अडकला आहे. त्याच्या लग्नातील खास फोटो अभिनेत्री अमृता बनेने सोशल मीडियावर शेअर केला आहे. गेल्या महिन्यात गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर साखरपुडा उरकत चेतनने नव्या आयुष्याची सुरुवात केली होती. साखरपुड्याप्रमाणे अभिनेत्याच्या लग्नाला देखील मराठी कलाविश्वातील बरेच कलाकार उपस्थित राहिले होते. याशिवाय अभिनेता पृथ्वीक प्रतापने त्याच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर चेतनच्या हळदीची खास झलक शेअर केली होती. त्याच्या हळदीला सुद्धा बरेच कलाकार उपस्थित होते. चेतनची पत्नी पायलने लग्नात पिवळ्या रंगाची नऊवारी साडी त्यावर लाल रंगाचा ब्लाऊज, भरजरी दागिने, हिरवा चुडा असा मराठमोळा लूक केला होता. चेतनने पांढऱ्या रंगाच्या सदऱ्यावर मजंठा रंगाचा छानसा असा शेला घेतला होता. हे नववधू या लूकमध्ये फारच सुंदर दिसत होते. अमृता बनेने त्यांच्या वरमाला विधीचा खास फोटो शेअर करत यावर नांदा सौख्यभरे... असं कॅप्शन दिलं आहे. तसेच या फोटोंमध्ये तिने चेतनसह त्याच्या बायकोला टॅग केलं आहे. दरम्यान, चेतनच्या लग्नाला मराठी कलाकारांची मांदियाळी पाहायला मिळाली. कलाविश्वातील अनेक कलाकारांनी अभिनेत्याच्या लग्नाला खास उपस्थिती लावत त्याला पुढील आयुष्यासाठी शुभाशीर्वाद दिले. सध्या मराठी मनोरंजनविश्वातून चेतनवर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात येत आहे.

# रवीना टंडनचे पती अनिल थडानी व्यवसाय काय करतात?

**एकेकाळी बॉलीवूडवर राज्य करणारी रवीना टंडन मधली काही वर्षे मोठ्या पडद्यापासून दूर होती. तिने २०२२ मध्ये 'केजीएफ २' मधून पुनरागमन केलं. हा चित्रपट त्या वर्षातील सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांपैकी एक होता. या कन्नड चित्रपटांमध्ये महत्त्वाची भूमिका साकारण्याशिवाय तिने नेटफ्लिक्सच्या क्राइम थ्रिलर वेब सीरिज 'अरण्यक'मध्ये कस्तुरी डोगराची मुख्य भूमिका साकारली होती. रवीनाबद्दल आपल्या सर्वांनाच माहितीये, पण तिचे पती अनिल थडानी यांच्याबद्दल लोकांना फारशी माहिती नाही. अनिल थडानी हे फिल्म इंडस्ट्रीतील एक मोठं नाव आहे. ते एए फिल्म्स या नॉन-स्टुडिओ डिस्ट्रीब्युशन कंपनीचे संस्थापक आहेत.**



अनिल थडानी यांच्या वितरण कंपनीने दक्षिणेतील चार बिग बजेट चित्रपटांच्या हिंदी व्हर्जनचे हक्क विकत घेतले आहेत. यामध्ये अल्लू अर्जुनचा चित्रपट 'पुष्पा २ : द रुल', राम चरणचा 'गेम चेंजर', प्रभास आणि दीपिका पदुकोणचा 'कल्की २८९८ एडी' आणि जुनियर एनटीआर, जान्हवी कपूर आणि सैफ अली खान स्टारर 'देवरा : भाग १' यांचा समावेश आहे. थडानी यांच्या वितरण कंपनीच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरही या चित्रपटांचे हक्क खरेदी करण्याबाबतची माहिती शेअर करण्यात आली होती. 'मनी कंट्रोल'च्या एका रिपोर्टनुसार, एए फिल्म्सने अल्लू अर्जुन आणि रश्मिका मंदान्ना यांचा 'पुष्पा २ : द रुल' उत्तर भारतात रिलीज करण्याच्या हक्कांसाठी २०० कोटी रुपये मोजले आहेत. रिपोर्ट्नुसार, थडानींच्या एए फिल्म्सने रामचरण आणि कियारा अडवाणी यांच्या चित्रपटाच्या हिंदी व्हर्जनचे हक्क ७५ कोटी रुपयांना घेतले. 'देवराः भाग १' चे हक्क ५० कोटी रुपयांना विकत घेतले. कंपनीने नाग अश्विनच्या 'कल्की २८९८ एडी' या पॅन इंडिया प्रोजेक्टचे हक्क १०० कोटी रुपयांना विकत घेतले आहेत.

- कोण आहेत अनिल थडानी? : अनिल थडानींचे वडील निर्माते व दिग्दर्शक कुंदन थडानी होते. 'स्टंप्ड' चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान अनिल व अभिनेत्री रवीना टंडन यांची भेट झाली. रवीनाने २००३ मध्ये या चित्रपटाद्वारे निर्माती म्हणून पदार्पण केलं होतं. दोघांच्या भेटीचं प्रेमात रुपांतर झालं, मग रवीना टंडन आणि अनिल थडानी यांनी २२ फेब्रुवारी २००४ रोजी उदयपूरच्या शिव निवास पॅलेसमध्ये लग्न केलं. त्यांना राशा आणि रणबीर ही दोन अपत्ये आहेत.
- एए फिल्म्सची सुरुवात : अनिल थडानी यांनी एए फिल्म्सची सुरुवात १९९३ मध्ये केली होती. चित्रपट वितरक होण्याच्या निर्णयाबाबत थडानी यांनी एकदा मुलाखतीत सांगितलं होतं. माझे कुटुंबीय बऱ्याच काळापासून वितरण व्यवसायात आहे. कौटुंबिक व्यवसायातून मी यातील बारकावे शिकलो. मग एक वेळ अशी आली की मला स्वतःचा काही वेगळा व्यवसाय करायचा होता. अनिल थडानींनी गेल्या ३० वर्षांत 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे', 'अग्निपथ', 'केजीएफ', 'आशिकी २', 'दिल धडकने दो', गली बॉय', 'राझी' सारख्या चित्रपटाला सपोर्ट केले आहे.
- दोघांची संपत्ती किती? : अनिल थडानी यांची कोट्यवधी रुपयांची संपत्ती आहे. 'लाइफस्टाइल एशिया' च्या वृत्तानुसार, रवीना टंडनची अंदाजे एकूण संपत्ती १६६ कोटी रुपये आहे, तर त्यांचे पती अनिल थडानी यांच्या संपत्तीची नेमकी माहिती अद्याप उपलब्ध नाही.



# सलमानसोबत या अभिनेत्रीने दिला होता लग्नाला नकार!

**बॉलीवूडचा भाईजान सलमान खान याचे जगभरात लाखो चाहते आहेत. आजतागायत अनेक अभिनेत्रींबरोबर सलमानचं नाव जोडण्यात आलं. अगदी लग्नापर्यंत गेलेल्या गोष्टी अयशस्वी ठरल्या. संगीता बिजलानीबरोबर सलमान लग्न करणार होता, अशीही चर्चा सुरू होती. सलमानने त्याही आधी एका प्रसिद्ध अभिनेत्रीला लग्नाची मागणी घातली होती; परंतु तिनं सलमानसोबत लग्नास नकार दिला होता.**

संजय लीला भन्साळी यांची भाची अभिनेत्री शर्मिन सेहगल मेहता हिला सलमाननं लग्नाची मागणी घातली होती. याबद्दल आता खुलासा करत शर्मिन म्हणाली, की ती जेव्हा दोन ते तीन वर्षांची होती तेव्हा 'हम दिल दे चुके सनम'च्या सेटवर ती पहिल्यांदा सलमान खानला भेटली होती.



सलमान खाननं तिला माझ्याशी लग्न करशील का, असं मस्करीत विचारलं होतं. त्यावर तिनं हसत हसत 'नाही', असं उत्तर दिलं होतं. शर्मिन अजूनही सलमानची फॅन आहे हे सांगताना ती म्हणाली की, 'प्यार किया तो डरना क्या' चित्रपटातील 'ओ ओ जाने जाना' या गाण्यातला सलमान तिला खूप आवडतो. तिनं स्पष्ट केलं की, इतक्या लहान वयात तिला लग्नाची संकल्पना समजली नव्हती आणि म्हणूनच तिनं नाही, असं उत्तर दिलं होतं. मामा संजय लीला भन्साळी यांच्याबरोबर काम करण्याचा अनुभवही शर्मिननं शेअर केला. १८ वर्षांची असताना 'देवदास' बघताना तिला कळलं होतं की, संजय लीला भन्साळी हे तिचे मामा आहेत. 'बाजीराव मस्तानी'मध्ये तिला त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी दिल्याबद्दल शर्मिननं भन्साळी यांचे आभार मानले आणि त्यांचं कौतुकही केलं. भन्साळी हे खूप मेहनती आणि एक उत्तम मार्गदर्शक आहेत. दरम्यान, शर्मिनच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर शर्मिन संजय लीला भन्साळी यांच्या 'हीरामंडी' या वेब सीरिजमध्ये झळकली आहे. ही वेब सीरिज नेटफ्लिक्सवर १ मे रोजी प्रदर्शित झाली. शर्मिनसह या वेब सीरिजमध्ये मनीषा कोईराला, सोनाक्षी सिन्हा, अदिती राव हैदरी, रिचा चड्ढा, संजीदा शेख या अभिनेत्रीदेखील आहेत.

## शॉर्ट न्यूज

### शहीद सुखदेव यांची जयंती उत्साहात साजरी

■ **संगमनेर :** तालुक्यातील तळेगाव दिघे येथील शिक्षणमहर्षी गुलाबराव गोविंदराव जोंधळे माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय महान क्रांतिकारक शहीद सुखदेव यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने प्राचार्य एच. आर. दिघे सहित उपस्थितांनी शहीद सुखदेव यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. जयंती निमित्ताने शहीद सुखदेव यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य एच. आर. दिघे यांच्या हस्ते करून अभिवादन लारण्यात आले. प्रसंगी पर्यवेक्षक बी. सी. दिघे, ज्येष्ठ शिक्षक राधाकिसन दिघे, बाबा जगताप उपस्थित होते.

### घरात घुसून महिलेला जबर मारहाण

■ **नगर :** १२ ते १३ जणांच्या टोळक्याने घरात घुसून दोन महिलांना मारहाण करून घराचा दरवाजा व खिडक्या तोडून नुकसान केले. अल्पवयीन मुलीसोबत लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करून तिला शिवीगाळ केल्याची घटना उपनगरात घडली. याप्रकरणी पीडित अल्पवयीन मुलीच्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात विनयभंग, मारहाण, पोक्सो कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. समीर अब्दुल शेख, हर्षल उजगरे, कुनाल उजगरे, आकाश आल्हाट, अक्षय साळवे, दर्शन आल्हाट, रवी आल्हाट व इतर पाच ते सहा अनोळखी विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

### मागील भांडणाच्या कारणावरून मारहाण

■ **राहुरी :** ज्ञानेश्वर अशोक झावरे, रा. टाकळीमियाँ, ता. राहुरी. हे दुपारच्या दरम्यान राहुरी शहरातील मेळवणे हॉस्पीटल समोर उभा होते. तेथे रविंद्र राऊत हा आला व मागील भांडणाच्या कारणावरून झावरे यांच्या डोक्यात टनक वस्तुने मारहाण करुन जखमी केले. आणि शिवीगाळ दमदाटी करून परत आमचे नादी लागला तर तुला सोडणार नाही, अशी धमकी दिली. ज्ञानेश्वर अशोक झावरे यांच्या फिर्यादीवरून आरोपी रविंद्र राऊत, रा. केंदळ, ता. राहुरी. याच्यावर शिवीगाळ व मारहाण केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास राहुरी पोलिसांकडून सुरु आहे.

### नेवाशात गर्ल्स स्किल डेव्हलपमेंट उपक्रम सुरू

■ **नेवासा :** ज्येष्ठ साहित्यिक, माजी खा. यशवंतरावजी गडाख यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मुळा एज्युकेशन सोसायटीने गर्ल्स स्किल डेव्हलपमेंट हा उपक्रम सुरू केला आहे. ताईसाहेब कदम कन्या विद्यालय व शारदाताई फाउंडेशन यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात येतं आहे. या उपक्रमांतर्गत शारदाताई फाउंडेशनच्या वतीने ताईसाहेब कदम कन्या विद्यालयातील ३ मुलींना शिलाई मशीन भेट देऊन मुलींसाठी खास प्रशिक्षण देण्यात येत आहे. या उपक्रमाचा शुभारंभ युवा नेते उदयन गडाख, माजी सभापती सुनिता गडाख यांच्या हस्ते करण्यात आला.

### श्रीरामपुरात कांदा १६०० रुपये क्विंटल

■ **श्रीरामपूर :** बाजार समितीत लुज कांद्याची आवक १०३ वाहनांद्वारे झाली असून लूज कांद्याला १८०५ रुपये प्रतिक्विंटल इतका भाव मिळाला आहे. या आठड्यात कांद्याची आवक कमी झाली आहे. या बाजार समितीत कांदा न. एक १२०० ते १६००, कांदा न. दोन ९०० ते १२००, कांदा न. तीन ५०० ते ९०० गोल्टी कांदा १२०० ते १४०० रुपये इतका भाव मिळाला असल्याची माहिती सभापती सुधीर नवले, सचिव साहेबराव वाबळे यांनी दिली.

# मुळा डाव्या कालव्यातून तात्काळ आवर्तन सोडा

## आ. तनपुरेंसह शेतकऱ्यांचा तहसील कार्यालयात ठिय्या



**राहुरी : प्रतिनिधी**

**उन्हाळ्याची तीव्रता वाढत असल्याने तालुक्यातील शेतीसाठी व पशुधन वाचविण्यासाठी मुळा डाव्या कालव्यातून तात्काळ आवर्तन सोडण्यात यावे या मागणीसाठी आमदार प्राजक्त तनपुरे यांच्या नेतृत्वाखाली संतप्त झालेल्या लाभधारक शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयात सुमारे तासभर ठिय्या मांडला अधिकाऱ्यांशी सकारात्मक चर्चा होऊन उद्यापर्यंत योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन अधिका-यांनी दिले.**

गुरुवारी सकाळी अकरा वाजता राहुरी तहसील कार्यालयात आ.तनपुरे यांनी लाभधारक शेतकऱ्यांसह ठिय्या मांडला. पाटबंधारे विभागाचे शाखा अभियंता विलास पाटील, मुळा डावा कालवा अभियंता अच्युत गिते, तहसीलदार नामदेव पाटील यांच्याशी चर्चा केली. यावेळी आमदार प्राजक्त तनपुरेंसह स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रवींद्र मोरे यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंत कार्यालयातून उठणार नाही असा पावित्रा लाभधारक शेतकऱ्यांनी घेतला होता अखेर जिल्हाधिकाऱ्यांशी भ्रमणध्वनी वरून चर्चा करत सायंकाळी तात्काळ बैठक आयोजित करून यामध्ये सकारात्मक योग्य ते निर्णय घेऊ असे आश्वासन भ्रमणध्वनीद्वारे जिल्हाधिकाऱ्यांनी आमदार तनपुरे यांना दिल्यानंतर तात्पुरत्या स्वरूपात हे आंदोलन आम्ही मागे घेत आहोत मात्र सायंकाळपर्यंत योग्य निर्णय झाला नाही तर उद्या नगर-मनमाड महामार्गावर शेतकऱ्यांसह जनावरांसह रास्ता रोको आंदोलन छेडले जाईल असा इशारा आ.तनपुरे यांनी दिला आहे.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अरुण तनपुरे, अमृत धुमाळ, दिलीप इंगळे, सुरेश करपे, किशोर महाराज जाधव, रवींद्र आढाव, प्रकाश भुजाडी, बाळासाहेब खुळे, ज्ञानेश्वर खुळे, उमेश खिलारी, पंडू तात्या पवार, शिवाजी थोरात, बाळासाहेब गाडे, आदिनाथ तनपुरे, प्रभाकर गाडे, सुनिल मोरे, बाळासाहेब गाडे, नवनाथ थोरात, भाऊसाहेब आढाव, संजय पोटे, शहाजी ठाकुर, दत्तात्रय कवाने, नवाब देशमुख, अँड रावसाहेब करपे, सतिश आढाव, अनिल पोटे,आनंद वने,विश्वास पवार,अक्षय वने,धनंजय सर्पे आदिंसह लाभधारक शेतकरी मोठ्या संस्थेने उपस्थित होते.

**आ.तनपुरेंचा थेट जिल्हाधिकाऱ्यांना फोन!**

कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत पालकमंत्र्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून नियोजन करून योग्य तो निर्णय घेण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार आ. प्राजक्त तनपुरे यांनी आता आवर्तन सोडने अत्यंत गरजेचे आहे म्हणून आवर्तन सोडण्याच्या सुचना दिल्या होत्या त्यानुसार निर्णयही झाला होता. मात्र अचानक सदर निर्णय रद्द झाल्याने आमदार तनपुरेंनी यांनी थेट जिल्हाधिकाऱ्यांना फोन केला. अन् संतप्त लोकभावना लक्षात घेता आवर्तन सोडणे गरजेचे आहे. हे निर्दशनास आणून दिले. जिल्हाधिकाऱ्यांनी देखील तात्काळ बैठक आयोजित करून सकारात्मक निर्णय घेण्यात येईल असे तनपुरेंना सांगितले.

**स्वाभिमानीने अधिकाऱ्यांना कोंडून घेण्याचा केला प्रयत्न.**

तहसील कार्यालयात ठिय्या आंदोलन सुरू असताना जोपर्यंत योग्य निर्णय होत नाही तोपर्यंत अधिकाऱ्यांना बाहेर जाऊ देणार नाही असा पवित्रा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रवींद्र मोरे यांच्यासह शेतकऱ्यांनी घेतला. त्यानंतर जिल्हाध्यक्ष रवींद्र मोरे यांनी अधिकाऱ्यांना कार्यालयात दरवाजा बंद करून लॉक लावुन कोंडून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र आ. तनपुरे यांनी विनंती केल्यानंतर मोरे यांनी दरवाजाचा लॉक उघडला.

# लक्षात ठेवा तुम्हालाही महाराष्ट्रात फिरायचंय !

## मुंडे बहीण-भावाला मनोज जरांगेंचाइशारा

**बीड : प्रतिनिधी**

**मलाही आता धमक्या येत आहेत, तुझ्याकडे बघून घेऊ, तुला जीवे मारू, असं म्हटले जात आहे. मला बीडमध्ये पाय ठेवू दिला जाणार नाही, असे देखील म्हटलं जात आहे, पण मुंडे बहीण -भावाने एक लक्षात घ्यावे, मला बीडमध्ये जरी येऊ दिले नाही, तर त्यांनाही महाराष्ट्रात फिरायचे आहे, असा इशारा मराठा आंदोलक मनोजजरांगे पाटील यांनी मुंडे बहीण-भावाला दिला आहे.**

बीडच्या केज तालुक्यातील नांदुर घाट इथं झालेल्या दगडफेकीत मराठा समाज बांधव जखमी झाले आहेत. या जखमी कार्यकर्त्यांची जरांगे पाटील यांनी बीड जिल्हा रुग्णालयात जाऊन भेट घेतली. यावेळी ते माध्यमांशी बोलत होते. जरांगे म्हणाले,



मराठा मताची यांना गरज आहे, पण मराठा समाज बांधवांची नाही. त्यांच्या व्यासपीठावर बसणाऱ्या नेत्यांनी ही बाब लक्षात घ्यायला पाहिजे. माझा लढा माझ्या समाज बांधवांसाठी आहे. त्यासाठी माझी बलिदानाची देखील तयारी असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

# पिंपरी चिंचवडमध्ये लोखंडी होल्डींग कोसळले

## वाहनांचे नुकसान, परिसरात खळबळ

**पिंपरी चिंचवड : प्रतिनिधी**

**मुंबई येथील घाटकोपर येथे लोखंडी होल्डींग कोसळून १६ जणांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाचा आता पिंपरी चिंचवड परिसरातील मोशी भागात लोखंडी होल्डिंग कोसळल्याची घटना समोर आली आहे. सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी झालेली नाही. चार दुचाकी आणि टेम्पोचे मोठे नुकसान झाले आहे. मात्र या घटनेमुळे मोठी दुर्घटना टळली आहे. हे होल्डींग रस्त्यावर कोसळले नाही तर मोठी दुर्घटना घडली असती.**

याबाबत प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपरी चिंचवड शहरात वादळी वाऱ्यासह पाऊसाने हजेरी लावली. काही भागात वादळी वाऱ्यासह पाऊस सुरू होता. पिंपरी चिंचवड पिंपरी चिंचवड परिसरातील मोशी येथे रस्त्याच्या कडेला असलेले लोखंडी होल्डींग अचानक कोसळले. मात्र हे होल्डींग कोसळले ते चार दुचाकी आणि एका चारचाकी गाडीवर कोसळले. मात्र यात गाड्यांवर कोणीही नव्हते. मुख्य रस्त्यावर हे होल्डींग रस्त्यावर कोसळले नाही. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. आता हे कोसळलेले होल्डींग अधिकृत की अनधिकृत याबाबत



माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे या गाड्यांचे झालेले नुकसान कोण भरून देणार हा खरा प्रश्न आहे.

**पिंपरी चिंचवड शहरात अनेक अनधिकृत होल्डींग?**

पिंपरी चिंचवड शहरात मागच्या वर्षी वादळी वाऱ्याने होल्डींग कोसळले होते. यात सात ते आठ महिलांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर प्रशासनाला जाग आली होती. मात्र काही दिवसातच तो प्रश्न पुन्हा धूळखात पडला. मात्र आजच्या घटनेने अनधिकृत होल्डींगचा प्रश्न पुन्हा समोर आला आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी प्रशासन हा अनधिकृत होल्डिंग्जचा प्रश्न मार्गी लावणार का की लोकांचे जीव गेल्यावर प्रशासनाला जाग येणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

(पान १ वरुन)

## कांदा प्रश्न : घोषणाबाजी तरुणाने सांगितली खरी कहाणी

बनला आहे. या भागातील शेतकरी अस्वस्थ आहे. पंतप्रधान मोदी या जिल्ह्यांमध्ये येऊन जर महत्त्वाच्या प्रश्नांना हात घालत नसतील तर साहजिकच कुणीतरी प्रश्न विचारणारच. नाशिकमध्ये हे पहिल्यांदा घडलेले नाही. याआधी तर लोकांनी कांदे फेकलेले आहेत. मोदींच्या सभेत घोषणा देणारा जर आमचा कार्यकर्ता असेल तर त्याचा मला अभिमान आहे.

### पवार, तटकरेंच्या आरोपात काहीच चुकीचे नव्हते

दुसरा मुद्दा, म्हणजे अजित पवार हे त्या खात्याचे प्रमुख असल्यामुळे त्यांच्यावर आम्ही आरोप केले. त्यांना जबाबदार धरणे साहजिकच होते. या १३-१४ वर्षांत तपास यंत्रणांनी सर्व काही तपासले. परंतु कोणत्याही आरोपपत्रात, यंत्रणांनी त्यांच्यावर (अजित) थेट भूमिका असल्याचं म्हटलं नाही. शेवटी, आपल्याला यंत्रणा आणि त्यांच्या तपासाला सामोरे जावे लागतेच, असं फडणवीस पुढे म्हणाले. कोकण विभागातील प्रकरणांमध्ये, एका यंत्रणेने एका आरोपपत्रात असेही म्हटले होते की, "आम्ही अजित पवार आणि सुनील तटकरे यांची भूमिकेचे तपासत आहोत." शेवटी त्यांना काही सापडले नाही. म्हणजे एकाही आरोपपत्रात त्यांच्या नावाचा उल्लेख नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

### अजितदादांची दांडी, भुजबळांची नाराजी तटकरे-शरद पवार भेटीची चर्चा

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे काल नाशिकमध्ये होते. त्यांनी पत्रकार परिषद घेण्यासाठी भुजबळांना आमंत्रण दिलं होतं. पण प्रदेशाध्यक्षांनी आमंत्रित करुनही भुजबळ पत्रकार परिषदेला अनुपस्थित राहिले. आपण प्रचारात सक्रिय आहोत. कोणतीही नाराजी नाही, असं भुजबळांकडून वारंवार सांगण्यात येतं. पण ते प्रचारात फारसे दिसत नाहीत. त्यामुळे महायुतीची नाशिकची जागा धोक्यात आली आहे.

अजित पवारांची गैरहजेरी, भुजबळांची नाराजी अशा चर्चा सुरु असताना पहाटेच्या सुमारास नाशिकच्या एमरॉल्ड पार्कमध्ये घडलेल्या घटनांनी अनेकजण बुचकळ्यात पडले. पहाटे साडे चारच्या सुमारास तटकरे हॉटेलवर पोहोचले. अर्ध्या तासानंतर ते इथून निघाले. विशेष म्हणजे शरद पवारांचा मुक्काम याच हॉटेलात होता. या दोन नेत्यांची भेट झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे.

नाशिकच्या एमरॉल्ड हॉटेलमध्ये तटकरे येऊन गेल्याच्या वृत्ताला शरद पवार गटाचे आमदार अनिल देशमुखांनी दुजोरा दिला आहे. तटकरे साहेब येऊन गेल्याचं मला समजलं. त्यांची आणि माझी भेट झाली नाही. पण ते काही कार्यकर्त्यांना भेटले, अशी माहिती देशमुखांनी दिली. साथ सोडून गेलेल्यांना पुन्हा सोबत घ्यायचं नाही, हे आमचं धोरण असल्याचं देशमुखांनी सांगितलं.

**दाव्यात तथ्य नाही, तटकरेंकडून भेटीचा इन्कार**

अनिल देशमुखांच्या दाव्यात काडीमात्र तथ्य नाही. तुतारीचा पराभव होणार असल्याच्या भीतीनं ते नैराश्याच्या गर्तेत गेले आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून अशी विधानं केली जात आहेत, असं तटकरे म्हणाले. काल मी बराच प्रवास केला. मला वॉशरुमला जायचं होतं.









# ईव्हीएमच्या स्टाँगरूमबाहेर लंके समर्थकांचा पहारा!

## ■१५ सहकाऱ्यांची नियुक्ती ■ दोन पाळयांमध्ये स्ट्राँगरूमवर करडी नजर

**नगर : प्रतिनिधी**

**१३ मे रोजी लोकसभा निवडणूकीसाठी नगर दक्षिण मतदारसंघासाठी मतदान झाल्यानंतर ईव्हीएम मशिन ठेवण्यात आलेल्या स्टाँगरूमबाहेर महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या सहकाऱ्यांनी २४ तास पहारा ठेवला आहे. प्रशासनाच्या वतीने त्यांच्यासाठी स्वतंत्र तंबूची व्यवस्था करण्यात येऊन तिथे सीसीटीव्ही कॅमेऱ्याची स्क्रीनही लावण्यात आली आहे.**





### इतर उमेदवारांची पाठ

**या गोदामात नगरसह शिर्डी मतदारसंघातील ईव्हीएम मशिनही ठेवण्यात आल्या आहेत. उमेदवारांच्या प्रतिनिधीसाठी उभारण्यात आलेल्या तंबूमध्ये मात्र केवळ नीलेश लंके यांचेच प्रतिनिधी उपस्थित असून इतर उमेदवारांच्या प्रतिनिधींनी मात्र तंबूकडे पाठ फिरविली असल्याचे चित्र आहे.**

### लंके समर्थक सतर्क

**प्रत्येक बुथवर मतदान झाल्यानंतर ईव्हीएम मशिन सबंधित तहसिल कार्यालयापर्यंत पोहचेपर्यंत तसेच त्या त्या मतदारसंघातील एकत्रीत ईव्हीएम मशिन नगरच्या एमआयडीसीतील स्टाँगरूमपर्यंत पोहचेपर्यत नीलेश लंके समर्थकांची त्यावर करडी नजर होती. ईव्हीएम स्ट्राँग रूममध्ये पोहचल्यानंतरही आता चार तारखेपर्यंत लंके समर्थक या व्यवस्थेवर डोळयात तेल घालून लक्ष ठेवणार आहेत.**

नगर दक्षिण मतदासंघात भाजपाचे विद्यमान खासदार डॉ. सुजय विखे व महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्यात हायहोल्टेज लढत झाली. येत्या ४ जुन रोजी ईव्हीएम मशिनमध्ये बंद झालेल्या मतांची मोजणी करण्यात येणार असून तोपर्यंत संपूर्ण मतदारसंघातील बुथनिहाय ईव्हीएम मशिन नगरच्या एमआयडीसीमधील वखार महामंडळाच्या गोदामातील स्ट्राँगरूममध्ये ठेवण्यात आलेले आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून गोदामाभोवती केंद्र, राज्य व स्थानिक पोलीस अशी त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे.

सुरक्षेचा उपाय म्हणून या भागातील वाहतूकही वळविण्यात आली असून जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ तसेच पोलीस अधिक्षक राकेश ओला हे दिवसातून दोनदा भेट देऊन सुरक्षा व्यवस्था तसेच इतर बाबींचा आढावा घेत आहेत.

उमेदवारांच्या प्रतिनिधींसाठी गोदामाबाहेर स्वतंत्र तंबूची व्यवस्था करण्यात आली असून प्रशासनाकडून ओळखपत्रे देण्यात आलेल्या प्रतिनिधींना तिथे प्रवेश देण्यात येत आहे. दरम्यान महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या वतीने १५ प्रतिनिधींची नियुक्ती करण्यात आली असून दोन पाळयांमध्ये हे प्रतिनिधी डोळयात तेल घालून या व्यवस्थेवर लक्ष ठेऊन आहेत. या तंबूमध्ये स्ट्राँगरूमसह इतर भागात बसविण्यात आलेल्या सीसीटीव्हीच्या चित्रणाची स्क्रिनही बसविण्यात आली आहे.

### विधानसभा निवडणूकीप्रमाणेच नियोजन

**सन २०१९ मध्ये नीलेश लंके यांनी विधानसभेची निवडणूक लढविली त्यावेळीही लंके समर्थकांनी पारनेर येथील पारनेर महाविद्यालयात ठेवण्यात आलेल्या ईव्हीएम मशिनवर करडी नजर ठेवली होती. तशाच पध्दतीने लोकसभा निवडणूकीतील ईव्हीएम मशिनवरही लक्ष ठेवण्यात येत असून कोणताही धोका पत्करण्यास लंके समर्थक तयार नाहीत.**

# जवळे परिसरातील गावांमध्ये पाणीटंचाई

## महिलांवर पाण्यासाठी भटकंतीची वेळ

**जवळा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील जवळे, गुणोरे, गाडीलगावसह परिसरातील गावांना पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना भटकंती करण्याची वेळ आली आहे. तसेच शेतातील पिके ही पाण्याअभावी जळू लागले आहेत.**



कुकडी डावा कालवा परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांनी पिण्याच्या पाण्यासाठी व शेतीसाठी पाणी सोडण्याची मागणी जोर धरू लागली आहे. चालू वर्षी कडक उन्हाळा असल्याने पाराही ३८ अंशाच्या पुढे गेला आहे. कुकडी कालव्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात केळी, डाळिंब, ऊस मोठ्या प्रमाणात आहे. फळबागांची लागवड शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर केली आहे. अशा स्थितीत पिकांना वेळेत पाणी मिळाले नाही तर शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होऊ शकते, अशी प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी व्यक्त केली. त्यामुळे कुकडी कालव्याला लवकरात लवकर पाणी सोडण्याची मागणी होत आहे.

### २५ मे रोजी आवर्तन : लंके

**कुकडी लाभ क्षेत्रतील शेतकऱ्यांच्या मागणीनंतर जलासंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून कुकडी डाव्या कालव्याचे आवर्तन सोडण्याची मागणी केली. मागणीची दखल घेऊन येत्या २५ मे रोजी आवर्तन सोडण्यात येईल अशी ग्वाही जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.**

**नीलेश लंके**
माजी आमदार

# मतदानापासून वंचित ठेवणारा इसम राहत्याचा!

## कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**नगर : प्रतिनिधी**

**नगर शहरात लोकसभा निवडणूकीसाठी मतदान सुरू असताना विशेषतः मुस्लिम मतदारांच्या बोटास शाई लावून त्यांना मतदानापासून वंचित ठेवणा-या रॅकेटचा महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी पर्दाफाश केल्यानंतर हा उद्योग करणा-या दोघांपैकी एकावर भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात भारतीय दंडविधान १८६० च्या १७१ फ कलमान्व्ये निवडणूकीत गैरवाजवी प्रभाव पाडल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान भिंगार कॅम्प पोलीसांनी आरोपी ताब्यात घेऊन प्रतिबंधात्मक कारवाई करून त्यास सोडून देण्यात आले. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेला इसम राहता तालुक्यातील आहे.**

दि.१३ मे रोजी लोकसभा निवडणूकीसाठी मतदान प्रक्रिया सुरू असताना नगर-पाथर्डी रस्त्यावर मतदानासाठी जाणाऱ्या नागरीकांच्या बोटास शाई लावून काही लोक त्यांना मतदानापासून वंचित ठेवत असल्याची माहती नीलेश लंके यांना समजल्यानंतर त्यांनी तिथे धाव घेत असे कृत्य करणारे दोघे इसम पकडले.

लंके हे घटनास्थळी आल्यानंतर दोघांपैकी एक जण तिथून पसार होण्यात यशस्वी झाला.

लंके यांनी त्यास इसमास भिंगार कॅम्प पोलीसांच्या ताब्यात दिल्यानंतर बाळासाहेब




कृषी अधिकारी रा.
नी अरूण परेशराम डांगे
ा. राहता जि. नगर
दाखल केली. फिर्यादी
नेवडणूकीनिमित्त नगर,
भागातील भरारी

लंके यांनी डांगे यास पोलीसांच्या हवाली केले त्यावेळी त्याच्याकडे निळया रंगाची शाई असलेली बाटली, तनवीर हबीब शेख यांच्या नावाचे मतदान ओळखपत्र नंबर असलेली चिठ्ठी त्यावर मतदाराचे नाव, यादी भाग क्रमांक, यादीतील अनुक्रमांक मतदान खोली क्रमांक लिहिलेले आढळून आले. त्यानुसार डांगे याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीसांनी डांगे याच्या विरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करून त्यास सोडून देण्यात आले.

# पारनेर बाजार समितीत कांद्याला २ हजारांचा भाव



**पारनेर : प्रतिनिधी**

**कृषी उत्पन्न बाजार समिती आवारात बुधवारी (ता. १५) १४ हजार २१६ कांदा गोण्यांची आवक झाली. आवक कमी झाल्याने प्रथम क्रमांकाच्या कांद्यास सर्वाधिक दोन हजार २०० रुपये, तर कमीत कमी गोलटी कांद्यास एक हजार रुपये प्रतिक्विंटल बाजारभाव मिळाला आहे.**

अनेक दिवसांपासून शेतकऱ्यांना कांद्यास बाजार मिळत नसल्याने शेतकरी सरकारवर नाराज आहेत. कांद्याचे बाजार वाढत नसल्याने शेतकऱ्यांचा उत्पादनाचा खर्च ही वसूल होत नाही. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी तोट्यात जात आहेत. निवडणूक काळात सरकारने कांद्यावरील निर्यतबंदी हटवली; मात्र निर्यातीवरील कर हटविला नसल्याने कांदा निर्यातीस अडचण येत आहे.

परिणामी कांदा दरात वाढ होताना दिसत नाही. दि. १५ मे रोजी पारनेरच्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात १४ हजार २१६ कांदा गोण्यांची आवक झाली. अनेक दिवसांपासून कांद्यास बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी मोठ्या प्रमाणावर सरकारवर नाराज आहेत. सध्या तालुक्यात पाणीटंचाई आहे. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला, तसेच दुधालाही बाजारभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांमधून नाराजीचा सूर आहे.

# घरफोड्याच्या गुन्ह्यातील सराईत ५ आरोपींना बेड्या

## कोतवाली पोलिसांची कारवाई

**नगर : प्रतिनिधी**



**केडगाव येथील घरफोडीच्या गुन्ह्यातील सराईत आरोपीला कोतवाली पोलिसांनी काल (गुरुवारी) जेरबंद केले. त्यामुळे पाच घरफोडीची प्रकरणे उघडकीस आली आहेत. विष्णू सोनबा धोत्रे (रा. वडारवाडी, केडगाव, नगर) असे जेरबंद आरोपीचे नाव आहे.**

**दाराचा कडीकोयंडा तोडून चोरी**

केडगाव येथील शाहूनगरच्या बालाजी कॉलनीतील रहिवासी मधुकर भावले हे सहकुटुंब ७ ते १२ मे या कालावधीत पुण्याला मुलाकडे गेले होते. दरम्यान, त्यांच्या बंद घराच्या दाराचा कडीकोयंडा चोरांनी तोडून घरातील १५ हजार रुपये चोरून नेले. या संदर्भात भावले यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल करून घेतला.

या घटनेचा तपास करण्याचे आदेश कोतवाली पोलीस ठाण्याचे निरीक्षक प्रताप दराडे यांनी दिले होते. कोतवाली पोलिसांना माहिती मिळाली की, ही घरफोडी विष्णू धोत्रे याने केली आहे. त्यानुसार पथकाने सापळा रचून आरोपीला जेरबंद केले. त्याच्याकडे पथकाने अधिक विचारपूस केली असता त्याने केडगावमधील घरफोडीसह आणखी पाच गुन्ह्यांची कबुली दिली. त्याने पथकाला घरात लपवून ठेवलेले २८ हजार रुपये रोख व २२ हजार रुपये किमतीचे सोने-चांदीचे दागिने असा ५० हजार रुपयांचा चोरीचा मुद्देमाल पोलिसांना काढून दिला.

# ‘जेके अकॅडमी’ चे विद्यार्थी अव्वल

## १२ विद्यार्थ्यांना ८० % पेक्षा जास्त मार्क




**नगर : प्रतिनिधी**

**गेली अनेक वर्षांपासून परीक्षेत सर्वोत्कृष्ट निकाल देणाऱ्या नगर मधील जामखेड रोड आर्मी पब्लिक स्कूलच्या शेजारी असणाऱ्या जे के अकॅडमी च्या क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी यंदाही सीबीएसइ राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक परीक्षा परिषद तर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेत अव्वल स्थानावर पोचले आहेत, ८०% पेक्षा जास्त मार्क १२ विद्यार्थ्यांना मिळाल्याची माहिती अकॅडमीच्या संचालिका प्रा. जया क्षिरसागर यांनी दिली.**

सीबीएसई बोर्डाचा दहावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे ,यामध्ये यश काळे हात ९३.७० टक्के गुण मिळवत टॉपर आला आहे तर सहा विद्यार्थ्यांना गणितामध्ये ९४ % च्या पुढे गुण मिळवले आहेत ,त्यामध्ये साक्षी तरटे, सिद्धांत नायक ,ऋतुजा कुटे , ओमकार गरजे, यश काळे , ध्रुव निमसे यांचा समावेश आहे.

या परीक्षेत यश काळे ९३ %, साक्षी तरटे ९१ % ,ऋतुजा कुटे ९०%, ओमकार गरजे ८७ %, सिद्धांत नायक ८७ %,श्रुती जरे ८५ % ,वेदांत शिंदे ८५ % ,साहिल मगर ८४% ,तन्मय कुंभाळ ८३ % ,ज्ञानल ८३%, राहुल दुयु ८० टक्के गुण मिळवून अव्वल यश संपादन केले आहे

या सर्वांना जे के अकॅडमीच्या संचालिका प्राजया क्षीरसागर ,प्रा नदीम शेख, प्रा राहुल शर्मा यांनी मार्गदर्शन केले.

सीबीएसई बोर्डाच्या निकाला प्रमाणेच जे के अकॅडमीचे विद्यार्थी यावर्षीही महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा परिषद निकाल मध्येही यश संपादन करतील असा विश्वास क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे.

# होळकर स्मृती करंडक वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

## स्पर्धकांनी सहभाग नोंदवावा : इंजि.डी.आर.शेंडगे

**नगर : प्रतिनिधी**

**इतिहासाच्या पानावर ज्यांचे नाव सुवर्ण अक्षरांनी कोरले गेले अशा कार्यकर्तृत्वान, कर्मयोगिनी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती त्रिशताब्दी महोत्सवानिमित्त विचार भारतीच्या वतीने राज्यस्तरीय खुल्या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धा सर्व वयोगटासाठी असल्याची माहिती स्पर्धा प्रमुख प्रा. अशोक सागडे यांनी दिली.**



या स्पर्धेसाठी १) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर - एक कुशल प्रशासक. २) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे धार्मिक कार्य. ३) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कृषी धोरण. ४) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक राष्ट्रवादाचे प्रतीक असे विषय ठेवण्यात आले आहेत. सदर स्पर्धा दोन टप्प्यात होणार असून शुक्रवार दि. २४ मे न्यू आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज च्या सेमिनार हॉल मध्ये प्राथमिक फेरी होईल. या फेरीमध्ये प्रथम येणाऱ्या ५० स्पर्धकांच्या प्रवेशिका स्वीकारल्या जातील. व त्यामधून परीक्षकांच्या मूल्य मापणानुसार पहिल्या ११ क्रमांकपर्यंत स्पर्धक निवडले जातील. त्यांची अंतिम फेरी शुक्रवार दि. ३१ मे रोजी यशवंतराव चव्हाण सहकार सभागृह, स्टेशन रोड, अहमदनगर येथे होईल. व त्यामधून प्रथम, द्वितीय, तृतीय, व उत्तेजनार्थ प्रथम व द्वितीय क्रमांक परीक्षकांच्या मूल्य मापणानुसार निवडले जातील तरी इच्छुक स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवावा.

स्पर्धेची नियमावली, बक्षिसे, प्रवेशिका फॉर्म, व इतर माहितीसाठी श्री बलभीम पठारे भ्रमणध्वनी क्रमांक ९४२०४७०००१, श्री प्रशांत जठार भ्रमणध्वनी क्रमांक ९७३०००३९२० या क्रमांकावर फोन करून माहिती घ्यावी असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. स्पर्धकांनी आपल्या प्रवेशिका दि. २१ मे पर्यंत वरील भ्रमणध्वनी क्रमांकावर पाठवाव्यात असे आवाहन विचार भारतीचे सुधीर लांडगे व अनिल मोहिते यांनी केले आहे.

# सद्गुरू श्री शंकर महाराज समाधी सोहळा संपन्न

## मंगलभक्त सेवा मंडळाच्या वतीने आयोजन

**नगर : प्रतिनिधी**

**मधील मंगल भक्त सेवा मंडळाच्या वतीने एमआयडीसीच्या मंगल दत्त क्षेत्रात शंकर महाराज समाधी दिन सोहळा मोठ्या उत्साहात व विविध कार्यक्रमांनी संपन्न झाला त्यानिमित्ताने दिवसभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**



एफ ७० मध्ये असलेले हे पुरातन क्षेत्र असून शंकर महाराजांचे अनुयायी राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते सकाळी अभिषेक सकाळी अभिषेक करण्यात आला ,नंतर शंकरगीता सामूहिक पारायण झाले दुपारी श्रीची महाआरती करण्यात येऊन परिसरात पालखी मिरवणूक काढण्यात आली व दु २ पासून महाप्रसाद सुरु झाला याठिकाणी श्री शंकर महाराजाचे उत्सव गेली ४० वर्षांपासून साजरे केले जातात , रात्री उशिरा पर्यंत भजने,व महाप्रसाद चालू होता व भाविक पण दर्शनाला येत होते.

येथील शंकर महाराजांच्या दरबारात सगळी नापासची शाळा आहेत जे जे जीवनात हरले ज्यांना आता कुठेही उत्तर प्राप्त होत नाही अशा त्या अवस्थेमध्ये ती व्यक्ती येथील चैतन्य दरबारामध्ये त्यांच्या चरणाशी लिन होतात आणि तिथूनच खऱ्या अर्थानं त्याच्या त्या प्रारब्ध झाला म्हणा त्याच्या त्या भविष्याला म्हणा पूर्णपणे व्हायला सुरुवात होते.

महाराज म्हणतात मैं कैलास का रहनेवाला, मेरा नाम है शंकर।दुनिया को समझाने आया, कर ले कुछ अपना घर।।यहां दुनिया में कई रंग है।यह रंग निराला है।पाया न भेद किसने, यह गहरा ही गहरा है।।या २० शब्दात शंकर महाराजांनी मानवाला परिपूर्ण सांगितले आहे. महाराज म्हणत मी शनिवारवाडयात पेशव्यांबरोबर पंगतीला बसलो आहे‘‘ही घटना साधारण १९३५ची आहे म्हणजे महाराजांनी जेव्हा महासमाधी(१९४७) घेतली त्या वेळेस ते १६२ वर्षांचे होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com